मतदान संपल्यानंतर बॅटरी सुरु राहून मतमोजणीच्यावेळी
बॅटरी संपून निकाल दिसत नसल्यास करावयाची कार्यवाही

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**
**क्रमांक-रानिआ/मनपा-२००५/प्र.क्र. १८/का-५,**
**नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,**
**मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.**
**दिनांक- १३ जून, २००५.**

## आ दे श

राज्य निवडणूक आयोगाने अशा सूचना दिल्या आहेत की, मतदान संपल्यानंतर इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा पॉवर सप्लाय (बॅटरी) बंद करण्यात यावा तरीही काही वेळा मतदान केंद्राध्यक्ष पॉवर सप्लाय बंद न करता इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र निवडणूक निर्णय अधिका-यांकडे जमा करतात. अशा परिस्थितीत मतमोजणीच्यावेळी बॅटरी संपून गेल्याने निवडणुकीचा निकाल दिसू शकत नाही. हा निकाल पाहण्यासाठी बॅटरी कप्प्याचे सील तोडून नवी बॅटरी त्या मतदान यंत्रात घालण्यात यावी. असे करण्यापूर्वी संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांनी सोबत जोडल्याप्रमाणे घोषणापत्र (Declaration) लिहून त्यावर सर्व उपस्थित उमेदवार/मतमोजणी प्रतिनिधी यांच्या सहया घ्याव्यात.

**( नन्द लाल )**
**राज्य निवडणूक आयुक्त,**
**महाराष्ट्र**

**प्रति-**
सर्व महानगरपालिका आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्याधिकारी, नगर परिषदा/नगर पंचायती
राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी

C:\DOCUME~१\PATIL\MYDOCU~१\aab७१.doc

## परिशिष्ट

## घोषणापत्र

**---------------------- महानगरपालिका/नगर परिषद/नगर पंचायत/जिल्हा परिषद/पंचायत समिती सार्वत्रिक/पोट निवडणूक-**

प्रभाग क्रमांक/मतदार गट क्रमांक/मतदार गण क्रमांक----------------------------
मतदान केंद्र क्रमांक -----------------------
कंट्रोल युनिट क्रमांक- ----------------------

वर नमूद केलेल्या कंट्रोल युनिटमधील बॅटरी संपलेली असल्याने ती बॅटरी बदलण्यात येत आहे. संपलेल्या बॅटरीचा क्रमांक- --------------- होता व नवीन बॅटरी जी घालण्यात आली आहे तिचा क्रमांक ---------------- असा आहे.

निवडणूक निर्णय अधिकारी

दिनांक-
ठिकाण-
वेळ-

उमेदवार/मतमोजणी प्रतिनिधी यांच्या सहया

C:\DOCUME~१\PATIL\MYDOCU~१\aab७१.doc